# भारत-इराण परराष्ट्र कार्यालय सल्लामसलत

**03 जानेवारी, 2025**

19 वी भारत-इराण परराष्ट्र कार्यालय सल्लामसलत (FOC) नवी दिल्ली येथे 3 जानेवारी 2025 रोजी पार पडली.  श्री.  विक्रम मिसरी, परराष्ट्र सचिव आणि महामहिम डॉ. माजिद तख्त रावांची, इराणचे राजकीय व्यवहार विभागाचे उप-परराष्ट्र मंत्री यांनी सह-अध्यक्षता भूषविली.

2. उभय पक्षांनी द्विपक्षीय संबंधांचा विस्तृत आढावा घेतला. यामध्ये चाबहार बंदर, कृषी सहकार्य, वाणिज्य आणि अर्थविषयक प्रश्न तसेच सांस्कृतिक आणि नागरिक परस्पर संबंध विषयांचा समावेश होता.

3. समकालीन प्रादेशिक आणि जागतिक घडामोडी (अफगाणिस्तान, दक्षिण आशिया आणि दक्षिण काकेशस मधील सद्यपरिस्थिती) यावर चर्चा करण्यात आली.  परराष्ट्र सचिवांनी चाबहार बंदराचे अफगाणिस्तानच्या पुनर्निमाणात आणि आर्थिक विकासात महत्व अधोरेखित केले.  उभय पक्षांनी UN, BRICS आणि SCO सहित बहुस्तरीय संबंध दृढ करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला.

4. महामहिम डॉ. माजीद तख्त रावांची यांनी परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांची देखील भेट घेतली.  द्विपक्षीय संबंध आणि समकालीन प्रादेशिक आव्हानांवर चर्चेचा केंद्रबिंदू राहिला. उभय पक्षांनी दोन्ही राष्ट्रांच्या दरम्यान उच्च-स्तरीय आदानप्रदानाला चालना देण्याच्या मुद्द्यावर सहमती दर्शविली.

**नवी दिल्ली**

**03 जानेवारी, 2025**